सकाळ



**कोल्हापूर : कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांना 'महाराष्ट्र व महात्मा गांधी' ग्रंथ भेट देताना कोल्हापूरचे विभागीय माहिती उपसंचालक सतीश लळीत आणि जिल्हा माहिती अधिकारी स. रा. माने. सोबत आलोक जत्राटकर.**

# 'महाराष्ट्र आणि महात्मा गांधी' ग्रंथ कुलगुरूंना भेट

**कोल्हापूर, ता. १५** : माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने प्रकाशित केलेला 'महाराष्ट्र आणि महात्मा गांधी' हा ग्रंथ संदर्भमूल्य, उत्तम निर्मितीमूल्य असलेला, वाचनीय, विचार करायला लावणारा आणि संग्रही ठेवलाच पाहिजे, असा उत्कृष्ट ग्रंथ आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

कोल्हापूरचे विभागीय माहिती उपसंचालक सतीश लळीत आणि जिल्हा माहिती अधिकारी स. रा. माने यांनी हा ग्रंथ डॉ. शिंदे यांना भेट दिला. त्यानंतर त्यांनी ग्रंथाबद्दल आपले मत व्यक्त केले. विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर, सिनेट सदस्य मधुकर पाटील उपस्थित होते. कुलगुरूंना 'लोकराज्य'चा नोव्हेंबरचा अंकही देण्यात आला. 'महाराष्ट्र आणि महात्मा गांधी' हा ग्रंथ विक्रीसाठी जिल्हा माहिती कार्यालयात उपलब्ध असून, या ग्रंथाची किंमत २०० रुपये आहे. एकदम १० प्रतींवर २५ टक्के सवलत देण्यात येईल.

Kolhapur, Kolhapur-Today
16/11/2018 Page No. 7

# 'महाराष्ट्र आणि महात्मा गांधी' हा संग्राह्य ग्रंथ



कोल्हापूर : कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना 'महाराष्ट्र आणि महात्मा गांधी' ग्रंथ भेट देताना सतीश लळीत, एस. आर. माने यांच्यासह अन्य मान्यवर.

## – कुलगुरू डॉ. शिंदे

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने प्रकाशित केलेला 'महाराष्ट्र आणि महात्मा गांधी' हा ग्रंथ संदर्भमूल्य आणि उत्तम निर्मितीमूल्य असलेला, वाचनीय, विचार करायला लावणारा आणि संग्रही ठेवलाच पाहिजे असा उत्कृष्ट ग्रंथ आहे, असे गौरवोद्‌गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांनी काढले.

कोल्हापूरचे विभागीय माहिती उपसंचालक सतीश लळीत आणि जिल्हा माहिती अधिकारी एस. आर. माने यांनी हा ग्रंथ डॉ. शिंदे यांना भेट दिला. त्यानंतर त्यांनी ग्रंथाबद्दल आपले मत व्यक्त केले. यावेळी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर, शिवाजी विद्यापीठाचे सिनेट सदस्य मधुकर पाटील व अन्य मान्यवर उपस्थित होते.

पुढारी

# कोणत्याही कारणाने महिलांचे विभाजन नको

## मनीषा गुप्ते : महाराष्ट्र राज्य महिला आरोग्य हक्क परिषदेचे उद्घाटन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

समाजात महिलांचे हक्क अबाधित राखण्यासाठी सर्व महिलांनी संघटितपणे एकत्र येऊन आवाज उठवणे महत्त्वाचे आहे. परंतु, जाती, धर्म, पंथ, गाव, राज्य अशा कोणत्याही कारणाने महिलांचे विभाजन होता कामा नये. कारण, आधुनिक जगातही स्त्रियांवरील अन्याय, अत्याचार विविध मार्गांनी सुरूच असल्याचे मत ज्येष्ठ स्त्रीवादी कार्यकर्त्या मनीषा गुप्ते यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील ७ व्या महाराष्ट्र राज्य महिला आरोग्य हक्क परिषदेच्या उद्घाटनानंतर गुप्ते यांचे बीजभाषण झाले. श्रीमती शारदाबाई पवार अध्यासन आणि आरोग्य हक्क परिषद संयोजन समितीतर्फे 'महाराष्ट्र : सामाजिक, राजकीय वर्तमान आणि महिलांचे आरोग्य' या विषयावर ही परिषद गुरुवारपासून सुरू झाली. वि. स. खांडेकर सभागृहात कार्यक्रम झाला.

कार्यक्रमास ज्येष्ठ पत्रकार प्रतिमा जोशी, मीना शेषू, अध्यासनाच्या समन्वयक प्रा. डॉ. भारती पाटील आदींसह विविध क्षेत्रांतील मान्यवर महिला सहभागी झाल्या आहेत.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील ७ व्या महाराष्ट्र राज्य महिला आरोग्य हक्क परिषदेत गुरुवारी बीजभाषण करताना मनीषा गुप्ते. व्यासपीठावर डावीकडून मीना शेषू, प्रतिमा जोशी, प्रा. डॉ. भारती पाटील, प्रा. मेघा पानसरे आदी मान्यवर. (छाया : पप्पू अत्तार)**

मनीषा गुप्ते म्हणाल्या, महिलांचे आरोग्याचे प्रश्न गंभीर बनले आहेत. गरीब महिलांना आरोग्य सुविधा खरेच मिळते का, हा सवालही त्यांनी उपस्थित केला. आरोग्य हा मूलभूत अधिकार नसल्याने त्याचे सर्रास खासगीकरण झाले आहे. सरकारी दवाखाने अधिक कार्यक्षम आणि दर्जेदार राहावेत, यासाठी दबाव वाढवला पाहिजे. देशात आज राज्यघटनेने दिलेले हक्कांबाबत अधिक जागरूक राहायला हवे. जाती-धर्माच्या नावावर होत असलेल्या उन्मादाबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. पितृसत्ताक पद्धतीमुळे सर्वच महिलांचे शोषण सुरू असून यासाठी आपण मोकळेपणाने मते मांडली पाहिजेत. यावेळी प्रतिमा जोशी यांनी मनोगत व्यक्त केले.

परिषदेस तनुजा शिपूरकर, सीमा पाटील, अनुराधा गायकवाड, अनुराधा भोसले, पद्मिनी पिळणकर, शुभांगी कुलकर्णी, सुजाता मुस्कान आदींसह मोठ्या संख्येने महिला कार्यकर्त्या उपस्थित होत्या. प्रा. भारती पाटील यांनी परिषदेची विस्तृत माहिती आणि अध्यासनाची उद्दिष्टे सांगितली. संयोजिका डॉ. मेघा पानसरे यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. लता भिसे यांनी प्रास्ताविक केले. विजया जोरी यांनी सूत्रसंचालन केले. दोन सत्रांत आज विविध विषयांवर मान्यवरांनी विचार मांडले. महिलांनी उत्स्फूर्तपणे परिषदेत आपल्या हक्कांबाबत घोषणाबाजी केली.




कोल्हापूर : महिला आरोग्य हक्क परिषदेत मार्गदर्शन करताना ज्येष्ठ विचारवंत महिलावादी कार्यकर्त्या मनीषा गुप्ते. सोबत मिनाक्षी शेषू, डॉ. भारती पाटील, डॉ. मेघा पानसरे.

# महिलांचे आरोग्य हा देशातील गंभीर प्रश्न

प्रतिनिधी
कोल्हापूर

भारतीय संविधानाने देशाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले आहे. तरीही महिलांचे आरोग्य हा देशासमोरील महत्वाचा प्रश्न आहे. आरोग्य सेवा मूलभूत हक्क नसल्याने, सध्या आरोग्य सेवेचे खासगीकरण होताना दिसते. त्यामुळे संविधान बदलणाऱ्यांना बाजूला करून, संविधान वाचवण्यासाठी सर्व महिला संघटना एकत्र येवून प्रयत्न करू, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत महिलावादी कार्यकर्त्या मनीषा गुप्ते यांनी केले.

महाराष्ट्र राज्य महिला आरोग्य हक्क परिषद संयोजन समिती व शिवाजी विद्यापीठातील श्रीमती शारदाबाई पवार अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महाराष्ट्र महिला आरोग्य हक्क परिषदेत बीजभाषणात त्या बोलत होत्या. 'महाराष्ट्र: सामाजिक, राजकीय, वर्तमान आणि महिलांचे आरोग्य" हा या परिषदेचा विषय होता. शिवाजी विद्यापीठातील वि. स. खांडेकर सभागृहात या परिषदेचे उद्घाटन झाले. प्रमुख पाहुण्या म्हणून ज्येष्ठ पत्रकार प्रतिमा जोशी उपस्थित होत्या.

**महिलावादी कार्यकर्त्या मनिषा गुप्ते यांचे प्रतिपादन**

पान ४ पहा

### संविधान बळकट करण्यासाठी प्रयत्नांची गरज

सत्ता नियंत्रणाच्या ठिकाणी होणारा भेदभाव, हिंसाचार थांबवण्यासाठी जात व्यवस्थेचे उच्चाटन केले पाहिजे. कारण संविधान बदलून महिला व गरीब लोकांवर हिंसाचार करण्याचे वातावरण निर्माण केले जात आहे. घटना बदलानंतर अल्पसंख्यांक लोकांचे नागरिकरण रद्द होणार की राहणार हे मोठे प्रश्नचिन्ह आहे. त्यामुळे शासनावर विश्वास न ठेवता संविधान बळकट करण्याची गरज आहे.

महिलांचे आरोग्य हा देशातील गंभीर प्रश्न

पान १ वरुन

शनिवार १७ नोव्हेंबर रोजी या परिषदेचा समारोप होणार आहे.

ज्येष्ठ विचारवंत मनीषा गुप्ते म्हणाल्या, जातीव्यवस्था मोडून काढण्यासाठी या परिषदेचे आयोजन केले आहे. सध्या महिला शिक्षण घेतात, चांगल्या ठिकाणी नोकरीही करतात. पण तेथेही त्यांना पुरूषप्रधान संस्कृतीचा वाईट अनुभव येतो. त्यामुळे घरात आणि घराच्या बाहेर समानता मिळण्यासाठी लोकशाहीच्या अम्मलबजावणीची गरज आहे. घटना बदलून कोणी महिलांचा हक्क हिरावून घेण्याचा प्रयत्न करीत असेल तर त्यांना राजकीय तक्तावरून पायउतार करण्याची ताकद महिलांमध्ये आहे, हे दाखवून देण्याची वेळ आली आहे. जुन्या आजारांबरोबर डेंग्यू, चिकनगुणीया यासारखे नवीन आजार येत आहेत. त्यामुळे आरोग्याचा प्रश्न गंभीर होत चालला आहे. कोणाला आरोग्य देता येत नाही. पण चांगल्या आरोग्य सेवा देणे सरकारला शक्य आहे. सरकारी रूग्णालयात सर्वात उत्कृष्ठ सेवा मिळते. पण तिथे फक्त गरीबीने पिचलेला वर्ग जात असल्याने ही आरोग्य सेवा पोखरून निघत आहे. त्यामुळे सरकारी रूग्णालयातील आरोग्य सेवा सुदृढ करण्यासाठी प्रयत्न करूया, असा सल्लाही गुप्ते यांनी उपस्थित महिलांना दिला.

मिनाक्षी शेषू यांनीही मनोगत व्यक्त केले. डॉ. भारती पाटील यांनी आपल्या मनोगतात अध्यासन केंद्राचे उद्दीष्ट सांगितले. प्रास्ताविक लता भिसे यांनी केले. डॉ. मेघा पानसरे यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. यावेळी तनुजा शिपुरकर, अनुराधा भोसले, पद्ममिनी पिळणकर, शुभांगी कुलकर्णी, सीमा पाटील यांच्यासह ४०० महिला उपस्थित होत्या.

# महिलांच्या आरोग्याबाबत समाजाचा पुढाकार हवा

अर्जुन यकळकर



**महाराष्ट्र राज्य महिला आरोग्य हक्क परिषदेच्या उदघाटनप्रसंगी बोलताना डॉ. मनीषा गुप्ते. व्यासपीठावर डावीकडून मीना शेषू, प्रतिमा जोशी, डॉ. भारती पाटील, मेघा पानसरे आदी**

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

'तळागाळातील कुटुंबस्तरापासून ते उच्चभ्रू वर्गांपर्यंत महिलांच्या आरोग्याबाबत असलेली अनास्था, मानसिक व शारीरीक शोषण, तिच्या समतोल आहाराबाबत दुर्लक्ष याचा परिणाम महिलांच्या आरोग्यावर होत आहे. भांडवलशाही पुरूषप्रधान व्यवस्थेमध्ये तिच्या आरोग्याला गृहित धरले जाते. याचा परिपाक देशातील महिलांचे आरोग्य धोक्यात येण्यावर झाला असून सुदृढ समाजासाठी आरोग्यदृष्टीने सक्षम स्त्री ही गरज आहे. महिलांच्या आरोग्य हक्कासाठी संविधान व लोकशाहीने कणखर पुढाकार घेतला पाहिजे' असे प्रतिपादन ज्येष्ठ स्त्रीवादी कार्यकर्त्या डॉ. मनीषा गुप्ते यांनी केले.

महाराष्ट्र महिला आरोग्य हक्क परिषद आणि शिवाजी विद्यापीठातील श्रीमती शारदाबाई पवार अध्यासनाच्यावतीने आयोजित सातव्या महाराष्ट्र महिला आरोग्य हक्क परिषदेला विद्यापीठातील वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात गुरुवारी प्रारंभ झाला. या परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी बीजभाषण करताना त्या बोलत होत्या. 'महाराष्ट्र : सामाजिक, राजकीय वर्तमान आणि महिलांचे आरोग्य' या मध्यवर्ती विषयावर परिषदेत सखोल चर्चा होणार आहे. शनिवारपर्यंत (ता. १७) परिषद सुरू राहणार आहे.

डॉ. गुप्ते म्हणाल्या, 'आज देशातील सरकारी आरोग्यसेवा अक्षम बनल्या आहेत. त्यातही महिलांविषयक आरोग्य सुविधा तसेच हक्कांबाबत देशात कोणत्याही प्रकारची आग्रही भूमिका घेतली जात नाही. स्त्रियांचे आरोग्यविषयक हक्क जपण्यासाठी सरकारी आरोग्य सेवा सुदृढ होणे व खाजगी आरोग्य सेवांवरसुद्धा सरकारचे नियंत्रण असणे आवश्यक आहे. महिलांना

## डॉ. गुप्ते यांचे प्रतिपादन; महिला हक्क परिषद सुरू

भारतीय संविधानाने अनेक अधिकार दिले आहेत. यामध्ये आरोग्यविषयक हक्कांची जाणीव व जागृती महिलांमध्ये होण्यासाठी सरकारने यंत्रणा कार्यान्वित करणे गरजेचे आहे. तसेच महिलांनीही आपल्या आरोग्यविषयक हक्कांची जोपासना होण्यासाठी एकजुटीने प्रयत्न करणे आवश्यक आहे.'

प्रतिमा जोशी म्हणाल्या, 'स्त्रियांना सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. मात्र, आजही समाजात त्यांना रुढी परंपरा व अंधश्रद्धांच्या नावाखाली परिघाबाहेर ठेवले जाते. महिला ज्या व्यवसायात काम करतात, तेथील वातावरण अनेकदा त्यांच्या आरोग्यासाठी हानिकारक असते. पोट भरण्यासाठी कष्ट करणाऱ्या महिला त्याबाबत तक्रार करत नाहीत. मात्र, ही दुर्बलता जर महिलांच्या आरोग्यावर गदा आणणार असेल तर परिस्थिती बदलणे आवश्यक आहे. स्त्रियांचे बहुतांश आजार हे प्रामुख्याने लैंगिक व मानसिक आरोग्याशी संबंधित आहेत. त्यामुळे या गोष्टींवरसुध्दा आता उघडरित्या बोलणे आवश्यक बनले आहे.'

पहिल्या सत्रात विविध असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांचे प्रश्न आणि त्यातून आरोग्यावर होणारे परिणाम यासंबंधी चर्चा करण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने बीडी कामगार, ऊसतोड कामगार, घरगुती कामगार, विधवा व एकल महिला, कचरावेचक, बांधकाम कामगार महिला व त्यांचे प्रश्न आणि आरोग्य इत्यादींविषयी चर्चा करण्यात आली. दुसऱ्या सत्रात सरकारी आरोग्य सेवा, योजना आणि महिलांच्या आरोग्य अधिकारांचे हनन याविषयी मतप्रवाह मांडण्यात आले.

लता भिसे यांनी परिषदेच्या आयोजनाबाबतची भूमिका मांडली. व्यासपीठावर डॉ. भारती पाटील, मिना शेषू, डॉ. मेघा पानसरे उपस्थित होत्या. शुभदा देशमुख यांनी प्रास्ताविक केले. रवी देसाई, सुप्रिया पाटील, रीटा माने, माधुरी आहिरे, दीपाली वाघमारे यांनी विविध स्तरांतील महिलांच्या आरोग्यविषयक प्रश्नांकडे लक्ष वेधले. परिषदेत राज्यभरातून साडेतीनशे महिला व कार्यकर्त्या सहभागी झाल्या आहेत.

सकाळ

# बंधने झुगारण्याचे महिलांपुढे आव्हान

## मनीषा गुप्ते; शारदाबाई पवार अध्यासनातर्फे महिला आरोग्य हक्क परिषद

कोल्हापूर, ता. १५ : 'जात व धर्मावर विभाजन झालेल्या स्थितीत महिलांनी न्याय हक्कासाठी बंधने झुगारून काम करणे, हेच आव्हान आहे,' असे प्रतिपादन ज्येष्ठ स्त्रीवादी कार्यकर्त्या मनीषा गुप्ते यांनी आज येथे केले. शिवाजी विद्यापीठाच्या शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन केंद्रातर्फे आयोजित सातव्या महाराष्ट्र महिला आरोग्य हक्क परिषदेत त्या बोलत होत्या. त्यांच्या हस्ते परिषदेचे उद्‌घाटन झाले. ज्येष्ठ पत्रकार प्रतिमा जोशी प्रमुख उपस्थित होत्या. वि. स. खांडेकर भाषा भवनमध्ये परिषदेचे आयोजन केले आहे.

गुप्ते म्हणाल्या, की जो ज्ञान निर्माण करेल, तो मांडणी करेल, ही सध्याची स्थिती आहे. महिलांचे प्रश्न अधिक व्यापक करताना आरोग्य व महिला यांच्या व्याख्या समजून घेतल्या पाहिजेत. गर्भाशय असल्याने महिलांच्या वाट्याला चांगले व वाईट अनुभव येतात; मात्र महिला जाती व



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन केंद्रातर्फे गुरुवारी आयोजित सातव्या महाराष्ट्र महिला आरोग्य हक्क परिषदेच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलताना स्त्रीवादी कार्यकर्त्या मनीषा गुप्ते. शेजारी प्रतिमा जोशी, मीना शेषू, डॉ. भारती पाटील, डॉ. मेघा पानसरे.**

धर्माच्या पातळीवर दुरावल्या जात आहेत, हा सर्व महिलांचा अनुभव आहे. दुसऱ्या धर्माच्या नावाखाली महिलांना एकत्र कसे करायचे, यासाठी सजग राहावे. महिला आता बांध फुटल्यासारखे बोलत आहेत.

त्या म्हणाल्या, की आरोग्य सेवा देता येते, आरोग्य नाही. आरोग्य सेवेचा हक्क मिळवून घ्यावा लागतो. आरोग्य घटकाचा राज्यघटनेच्या मूलभूत तत्त्वांत समावेश नसल्याने त्याचे खासगीकरण झाले आहे. त्याचा परिणाम गरीब, अल्पसंख्याक महिलांवर होत आहे. सर्वांत उत्कृष्ट सेवा खासगीत दिली जाते. त्या रांगेत होतकरू कुटुंबे दिसत आहेत. हे उत्तर नसलेले प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यातून आरोग्य सेवा पोखरून जाते. खासगी आरोग्य सेवांचे नियंत्रण सरकार करीत नाही.

मीना शेषू म्हणाल्या, "समाजाला पूर्णपणे बदलण्याची ताकद आमच्यात आहे. प्रत्येक वेळी लोकांत महिला फार काम करीत नाहीत, असा समज आहे, मात्र हा समज खोटा असून, महिलांचे हक्क व मानवाधिकारासाठी काम करू. जे संविधान बदलायचा प्रयत्न करीत आहेत, त्यांना पायउतार करण्याची क्षमता आपल्यात आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सन्मानाने जगण्याचा दिलेला अधिकार आहे."

डॉ. भारती पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. त्यांनी शारदाबाई पवार अध्यासन स्थापन होण्यामागील पार्श्वभूमी सांगितली. डॉ. मेघा पानसरे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.

### गुप्ते म्हणतात...

- महिलेला आजार झाल्याचे कळताच हिंसाचार वाढतो
- कौटुंबिक हिंसाचारात महिलेचे आयुष्य टेनिस बॉलसारखे होते
- नवरा दारू पिऊन सरपंचाला नव्हे बायकोलाच मारतो

### जात-धर्माच्या नावाखाली उन्माद

**संविधानातील हक्क बाजूला गेले तर जे बाहेर आहे, ते घरात यायला किती वेळ लागणार आहे, असा प्रश्न गुप्ते यांनी उपस्थित केला.**



## मनीषा गुप्ते यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात राज्य महिला आरोग्य हक्क परिषदेचा प्रारंभ

# हक्कासाठी विभाजन नको, एकजूट हवी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** जाती, धर्म, पंथ, आदींच्या पातळीवर महिला एकमेकांपासून दुरावत आहेत. त्यांचे अशा पद्धतीने होणारे विभाजन क्लेशदायी आहे. त्यामुळे आरोग्य, सामाजिक, शैक्षणिक हक्क मिळविण्यासाठी आपल्याला विभाजन नको, तर एकजूट राखणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ स्त्रीवादी कार्यकर्त्या, विचारवंत मनीषा गुप्ते यांनी गुरुवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील सातव्या महाराष्ट्र राज्य महिला आरोग्य हक्क परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी त्यांचे बीजभाषण झाले. विद्यापीठातील श्रीमती शारदाबाई पवार अध्यासन आणि आरोग्य हक्क परिषद संयोजन समितीतर्फे आयोजित परिषदेचा विषय 'महाराष्ट्र : सामाजिक, राजकीय वर्तमान आणि महिलांचे आरोग्य' असा आहे. वि. स. खांडेकर सभागृहातील या कार्यक्रमास संपदा ग्रामीण महिला संस्थेच्या (संग्राम) जनरल सेक्रेटरी मीना शेषू, ज्येष्ठ पत्रकार प्रतिमा जोशी, अध्यासनाच्या समन्वयक प्रा. डॉ. भारती पाटील प्रमुख उपस्थित होत्या. ज्येष्ठ स्त्रीवादी कार्यकर्त्या मनीषा गुप्ते म्हणाल्या, महिलांचे प्रश्न सोडविण्यासाठी कार्यरत असणाऱ्या चळवळीतील कार्यकर्त्यांनी कष्टकरी महिलांचे प्रश्न मांडण्यासाठी सजग राहिले पाहिजे. आरोग्य हा मूलभूत अधिकार नसल्याने त्याचे खासगीकरण सहजतेने होत असून, त्याचा परिणाम गरीब, महिला, अल्पसंख्याकांवर होत आहे. सरकारी आरोग्यसेवा सुदृढ कशी होईल, याकडे आपण लक्ष द्यावे. देशात आज राज्यघटनेने दिलेले हक्क निघून जात आहेत. घरातील आणि बाहेरील कृत्रिम विभाजन दूर करणे हे आपल्यासमोरील मोठे आव्हान आहे. ज्येष्ठ पत्रकार प्रतिमा जोशी म्हणाल्या, महिलांचे विविध हक्क कायम राहण्यासाठी संविधान अबाधित राहणे आवश्यक आहे.

या कार्यक्रमास तनुजा शिपूरकर, सीमा पाटील, अनुराधा गायकवाड, शुभांगी कुलकर्णी, सुजाता मुस्कान, अनुराधा भोसले, पद्मिनी पिळणकर, आदींसह राज्यभरातील सुमारे पाचशे महिला कार्यकर्त्या उपस्थित होत्या. प्रा. भारती पाटील यांनी परिषद आणि अध्यासनाची उद्दिष्टे सांगितली. परिषदेच्या संयोजिका डॉ. मेघा पानसरे यांनी पाहुण्यांची ओळख करुन दिली. लता भिसे यांनी प्रास्ताविक केले. विजया जोरी यांनी सूत्रसंचालन केले. दरम्यान, उद्घाटनानंतरच्या सत्रांमध्ये ऊसतोडणी, घरगुती, बांधकाम, कचरावेचक, असंघटित क्षेत्रांत काम करणाऱ्या महिलांचे प्रश्न, त्यांचे आरोग्याधिकार, शासकीय आरोग्य सेवा, योजनांबाबत चर्चा झाली.





कोल्हापुरात गुरुवारी शिवाजी विद्यापीठामध्ये राज्य महिला आरोग्य हक्क परिषदेचे उद्घाटन ज्येष्ठ स्त्रीवादी कार्यकर्त्या मनीषा गुप्ते यांच्या हस्ते झाले. यावेळी डावीकडून प्रतिमा जोशी, भारती पाटील, मीना शेषू, मेघा पानसरे उपस्थित होत्या. दुसऱ्या छायाचित्रात उद्घाटनप्रसंगी ज्येष्ठ स्त्रीवादी कार्यकर्त्या मनीषा गुप्ते यांचे बीजभाषण झाले. तिसऱ्या छायाचित्रात 'संग्राम' संस्थेच्या जनरल सेक्रेटरी मीना शेषू यांनी मार्गदर्शन केले.

### अन्यथा सन्मानाचा अधिकार हिसकावून घेऊ

समाजाला बदलण्याची ताकद आमच्यात आहे. संविधान बदलण्याचा प्रयत्न करीत आहेत, त्यांना पायउतार करण्याचे काम आपण करूया, असे आवाहन 'संग्राम' संस्थेच्या जनरल सेक्रेटरी मीना शेषू यांनी केले. त्या म्हणाल्या, महिलांचे हक्क आणि मानवाधिकारांसाठी आपण काम करूया. हा देश सर्वांचा असून येथील भूमीवर जगण्याचा, सन्मानाचा अधिकार प्रत्येकाला आहे. जर हा अधिकार आम्हाला दिला नाही, तर आम्ही तो हिसकावून घेऊ.

### परिषदेतील आजचे विषय

परिषदेतील विविध सत्रांत आज, शुक्रवारी 'धर्म, जाती आधारित उन्मादाचे अस्वस्थ वर्तमान', 'वंचित, अल्पसंख्याक समूहातील महिलांवर आरोग्य व्यवस्थेत होणारा भेदभाव', 'विषमतामूलक आर्थिक धोरणं', 'माइक्रोफायनान्सचा वेढा' या विषयांवर चर्चा होणार आहे.

### मनीषा गुप्ते म्हणाल्या

- सध्याच्या कुजलेल्या आरोग्य सेवेत आपण हक्क कसा मिळविणार हा आपल्यासमोरचा प्रश्न आहे.
- संविधान बदलले, तर कोणताच हक्क अबाधित राहणार नाही.
- घरात आणि बाहेर जर आपल्याला समानता, अहिंसा, शांतता हवी असेल, तर संविधानाशिवाय कोणताही पर्याय नाही.

# महिलांचे आरोग्य देशासमोरील गहन प्रश्न

## – मनीषा गुप्ते

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** आरोग्य सेवा हा मूलभूत हक्क नसल्याने सध्या देशात आरोग्य सेवेचे खासगीकरण होत आहे. त्यात महिलांच्या आरोग्याबाबत तर आपण खूपच मागे आहोत. सध्या महिलांच्या आरोग्याचा प्रश्न हा देशापुढील सर्वात गहन प्रश्न आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ महिलावादी विचारवंत मनीषा गुप्ते यांनी केले. त्या आयोजित कार्यक्रमात बोलत होत्या.

महाराष्ट्र राज्य महिला आरोग्य हक्क परिषद समिती, शिवाजी विद्यापीठ श्रीमती शारदाबाई पवार अध्यासन यांच्या वतीने विद्यापीठ वि. स. खांडेकर सभागृह येथे महाराष्ट्र महिला आरोग्य हक्क परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवारी या परिषदेचे उद्घाटन मनीषा गुप्ते यांच्या हस्ते करण्यात आले. स्वागत व प्रास्तावीक लता भिसे यांनी केले. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती ज्येष्ठ पत्रकार प्रतिमा जोशी, अध्यासन केंद्राच्या डॉ.भारती पाटील, मीनाक्षी शेषू यांची होती. पाहुण्यांची ओळख डॉ. मेघा पानसरे यांनी करून दिली. दरम्यान, गुप्ते यांनी 'महाराष्ट्र सामाजिक, राजकीय वर्तमान आणि महिला' या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले.

गुप्ते म्हणाल्या, भारतीय



संविधानाने प्रत्येक नागरिकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले आहे; पण सध्या संविधान बदलण्याचा डाव काही घटकाकडून होत आहे. अशा लोकांना बाजूला करणे गरजेचे आहे. अशा परिषदेच्या माध्यमातून जातीव्यवस्था मोडून काढण्यास मदत होईल.

▶▶ पान २ वर

# महिलांचे आरोग्य देशासमोरील गहन प्रश्न

**(पान १ वरून)** सध्या महिला घराबाहेर पडत आहेत. नोकरी करत आहेत; पण आपल्या पुरुष प्रधान संस्कृतीत महिलांना वाईट अनुभव येत आहेत. महिलांना समानता मिळवण्यासाठी लोकशाही अधिक सुदृढ होणे गरजेचे आहे. महिलांच्या हक्कावर कोणी गदा आणण्याचा प्रयत्न केल्यास अशाना राजकीय मोठी किंमतही मोजावयास लागू शकते इतकी ताकद महिलांमध्ये आहे. चांगल्या आरोग्य सेवा देणे ही शासनाची जबाबदारी आहे. सरकारी रुग्णालयात चांगली सेवा मिळते; पण तिथे फक्त पिचलेला वर्ग जातो. त्यामुळे ही सेवा पोखरुन निघाली आहे.

दरम्यान, परिषदेच्या पहिल्या सत्रात बुधवारी सकाळी असंघटित काम करणाऱ्या महिलांचे प्रश्न आणि आरोग्य या विषयावर चर्चा झाली. दुसऱ्या सत्रात शासकीय आरोग्य योजना, आरोग्य अधिकार हनन तर तिसऱ्या सत्रात योजनांची अंमलबजावणी या विषयांवर चर्चा झाली. शनिवार, दि.१७ रोजी परीषदेचा समारोप होणार आहे. यावेळी तनुजा शिपुरकर, अनुराधा भोसले, पद्मिनी पिळणकर, शुभांगी कुलकर्णी यांच्यासह महिला उपस्थित होत्या.

लोकमत

## दैनंदिनी



- **परिषद** : शिवाजी विद्यापीठात महाराष्ट्र महिला आयोग्य हक्क परिषद. **विषय** : महाराष्ट्र : सामाजिक, राजकीय वर्तमान आणि महिलांचे आरोग्य. **स्थळ** : वि. स. खांडेकर भवन. **वेळ** : सकाळी ९.३० ते सायं. ६ वा.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 NOV 2018
तरुण भारत



# शिवाजी विद्यापीठाचा रविवारी ५६ वा वर्धापन दिन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा ५६ वा वर्धापन दिन रविवार १८ रोजी सकाळी ८.३० वाजता साजरा करण्यात येणार आहे. या वर्धापन सोहळ्यासाठी जळगाव येथील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. पी. पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तर प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थिती दर्शवणार असून, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थान भुषवणार आहेत. यावेळी विद्यापीठातील गुणवंत शिक्षक व प्रशासकीय सेवक, संलग्न महाविद्यालयातील गुणवंत शिक्षक व प्रशासकीय सेवक, विद्यापीठातील शिक्षक व प्रशासकीय सेवकांची शैक्षणिक गुणवत्ता संपादन केलेली पाल्ये, बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक व प्राचार्य सुमतिबाई पांडुरंग पाटील आदर्श शिक्षिका पुरस्कार प्राप्त शिक्षकांचा गौरव, प्रशासकीय गुणवत्ता अभियान पुरस्कार आदी कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. हा कार्यक्रम मुख्य इमारतीतील राजर्षी शाहू सभागृहात होईल. तरी या कार्यक्रमाला सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले आहे.

पुढारी

## संक्षिप्त

# विद्यापीठाचा रविवारी वर्धापनदिन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा रविवारी (दि. १८) वर्धापनदिन साजरा होत आहे. यानिमित्त गुणवंत शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, गुणवंत पाल्य आदींना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. पी. पाटील प्रमुख पाहुणे उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे तर प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले आहे.

# विद्यापीठाचा रविवारी वर्धापनदिन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा ५६ वा वर्धापनदिन रविवारी (ता. १८) साजरा करण्यात येणार आहे.

जळगाव येथील कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. पी. पाटील उपस्थित राहणार आहेत. सकाळी साडेआठ वाजता ध्वजवंदन करण्यात येणार आहे. त्यानंतर गुणवंत शिक्षक, सेवक, गुणवत्ता अभियान पुरस्कार प्रदान केले जातील.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठाचा रविवारी वर्धापन दिन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा ५६ वा वर्धापन दिन रविवारी (ता. १८) होत असून त्याची तयारी सुरू आहे. जळगाव येथील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. पी. पी. पाटील प्रमुख उपस्थित असतील. सकाळी साडेआठ वाजता ध्वजवंदन झाल्यानंतर राजर्षी शाहू सभागृहात सकाळी पावणेनऊ वाजता कार्यक्रमास सुरवात होईल. या वेळी विविध पुरस्कारांचे वितरण होईल. गुणवंत शिक्षक, प्रशासकीय सेवकांच्या पुरस्काराची रक्कम यंदा विद्यापीठाने वाढवली आहे. त्याची अंमलबजावणी होणार आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

Kolhapur, Kolhapur-Today
16/11/2018 Page No. 2

सकाळ

# पंडित नेहरू यांना विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर** : माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात त्यांना अभिवादन करण्यात आले. शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र इमारतीमध्ये नेहरू अभ्यास केंद्रातर्फे हा कार्यक्रम झाला. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते पंडित नेहरू यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, अधिष्ठाता डॉ. भारती पाटील, डॉ. ए. एम. गुरव, इनोव्हेशन व इनक्युबेशन सेंटरचे संचालक डॉ. आर. के. कामत, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. आर. पी. भणगे उपस्थित होते.

Kolhapur, Kolhapur-Today
16/11/2018 Page No. 5

# ‘इकोफ्रेंडली कप’ला स्टार्टअप

कोल्हापूर टाइम्स टीम

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागातील एम. टेक फूड टेक्नॉलॉजीची विद्यार्थिनी स्वागता प्रशांत कावळे हीने इको- फ्रेंडली कप तयार केला आहे. या कपच्या माध्यमातून तिने केलेल्या संशोधनाची स्टार्टअप इंडियाने दखल घेतली. स्वागताने बनवलेला कप पर्यावरणपूरक इडिबल कप प्रथम पुरस्काराचा मानकरी ठरला. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी व राज्याचे ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते स्वागताला ७५ हजार रुपयांचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

मुंबई येथे स्टार्टअप इंडिया महाराष्ट्र यात्रेचे आयोजन करण्यात आले होत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या यात्रेचा शुभारंभ झाला. या यात्रेत महाराष्ट्रातील हजारो स्पर्धक सहभागी झाले होते.

अंतिम फेरीत निवड झालेल्या ३०९ स्पर्धकांमधून इनोव्हेशन सस्टेनेबिलिटी या विभागातून स्वागताच्या इकोफ्रेंडली कप संशोधनाची निवड करण्यात आली. या कपामध्ये थंड अथवा गरम पदार्थ ठेवल्यास त्यावर कोणताही परिणाम होत नाही. या कपाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याचे सेवन करता येते व कचरा म्हणून फेकला तरी त्याचे विघटन होते. त्यामुळे पर्यावरणाला धोका पोहचत नाही. हा कप बायोडिग्रेडेबल असल्याने स्वागताने त्याला ‘इकोफ्रेन्डली इडिबल कप’ असे नाव दिले आहे. हे संशोधन अनेक तांत्रिक चाचण्यामध्ये यशस्वी ठरले असून इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन ॲडव्हान्स रिसर्च इन लाइफ सायन्समध्ये या इडिबल कप संदर्भात शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत.

स्वागता कावळे ही शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातून एम. टेक. इन फूड टेक्नॉलॉजी विभागात पदव्युत्तर शिक्षण घेत आहे. विभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी, समन्वयक डॉ. ए. के. साहू , डॉ. योगिता चव्हाण ,डॉ. आय. एस. उडचाण, डॉ. एस. एम. लोखंडे यांचे सहकार्य लाभले. तसेच कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांचे प्रोत्साहन लाभले.




शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागातील एम. टेक फूड टेक्नॉलोजीची विद्यार्थिनी स्वागता प्रशांत कावळे हिने बनवलेल्या इकोफ्रेंडली कप संशोधनास केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान केला.

## तंत्रज्ञान विभागातील विद्यार्थिनीच्या प्रकल्पाची दखल






**मुंबई : शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थिनी स्वागता प्रशांत कावळे हिला महाराष्ट्र यात्रेमध्ये स्टार्टअप इंडिया पुरस्कार देऊन गौरवताना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि राज्याचे ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे आदी.**

# शिवाजी विद्यापीठातील स्वागता कावळेला स्टार्टअप इंडिया पुरस्कार

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

प्लास्टिक कपला पर्याय म्हणून शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागातील एम. टेक फूड टेक्नॉलॉजीची विद्यार्थिनी स्वागता प्रशांत कावळे हिने इको-फ्रेंडली कप तयार केल्याबद्दल नुकत्याच मुंबईमध्ये पार पडलेल्या स्टार्ट अप इंडिया महाराष्ट्र यात्रेमध्ये तिला स्टार्टअप इंडिया पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

या कपमध्ये थंड अथवा गरम पदार्थ ठेवल्यास त्यावर कोणताही परिणाम होत नाही. या कपाचे विघटन होऊन तो नष्टही होतो. त्यामुळे पर्यावरणाला धोका पोहोचत नाही. तो बायोडिग्रेडेबल असल्याने स्वागताने त्याला 'इको फ्रेंडली इडिबल कप' असे नाव दिले आहे.

या स्टार्टअप यात्रेत राज्यातील हजारो स्पर्धक सहभागी झाले होते. अंतिम ३०९ स्पर्धकांमधून इनोव्हेशन सस्टेनेबिलिटी या विभागातून स्वागताचा पर्यावरणपूरक 'इडिबल कप' प्रथम पुरस्काराचा मानकरी ठरला. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि राज्याचे ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते स्वागता कावळे हिला ७५ हजार रुपयांचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

स्वागता कावळे ही शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातून एम. टेक इन फूड टेक्नॉलॉजी विभागात पदव्युत्तर शिक्षण घेत आहे. फूड टेकनॉलॉजी विभागाचे समन्वयक डॉ. ए. के. साहू आणि डॉ. योगिता चव्हाण हे तिचे मार्गदर्शक आहेत. तसेच या संशोधनासाठी विभागातून वेळोवेळी डॉ. आय. एस. उडचाण, डॉ. एस. एम. लोखंडे यांचे सहकार्य लाभले. शोध प्रकल्पासाठी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी यांचे प्रोत्साहन व विशेष सहाय्य लाभले.

लोकमत

# विद्यापीठातील 'शाहू सभागृहात' आता 'वायफाय'

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात आता इंटरनेटची 'वायफाय' सुविधा मिळणार आहे. या सभागृहाच्या नूतनीकरणाचे काम सध्या सुरु आहे. नूतनीकरण केलेल्या या सभागृहात विद्यापीठाच्या वर्धापनदिनाचा कार्यक्रम होणार आहे.

विद्यापीठाच्या मुख्य इमारतीमध्ये राजर्षी शाहू सभागृह (सिनेट हॉल) आहे. साधारणत: ५० वर्षापूर्वी हे सभागृह उभारण्यात आले आहे. त्यावरील पत्रे आणि व्यासपीठावरील फरशा खराब झाल्या आहेत. ते बदलण्याचे काम केले जात आहे. या नूतनीकरणाअंतर्गत सभागृहात इंटरनेटची वायफाय सुविधा उपलब्ध करुन दिली जाणार आहे. विविध परिसंवाद, चर्चासत्र, व्याख्याने आदी कार्यक्रमांसाठी संबंधित सुविधा उपयुक्त ठरणार आहे. ही सुविधा नक्कीच सर्वांना फायद्याची ठरेल.

दिव्यांग विद्यार्थी, शिक्षक, नागरिकांसाठी याठिकाणी रॅम्पची सुविधा करण्यात आली आहे. गेल्या दोन महिन्यांपासून नूतनीकरणाचे काम सुरु आहे. येत्या दोन दिवसांत ते पूर्ण होईल, असे विद्यापीठाच्या स्थापत्य विभागाचे उपकुलसचिव डॉ. जी. एस. कुलकर्णी यांनी सांगितले.

Kolhapur Main
Page No. 5 Nov 16, 2018
Powered by: erelego.com

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 NOV 2018
तरुण भारत



सोळांकूर : स्पर्धेत सहभागी झालेल्या महाविद्यालयीन विद्यार्थीनी.

# सोळांकूर महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठांतर्गत योग स्पर्धा उत्साहात

प्रतिनिधी
सरवडे

सोळांकूर (ता.राधानगरी) येथील यशवंतराव पाटील विज्ञान महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय योगा स्पर्धा उत्साहात पार पडली. या स्पर्धेत कोल्हापूर, सांगली, सातारा या तीन जिल्ह्यातील स्पर्धक सहभागी झाले होते.

स्पर्धेचे उद्‌घाटन संस्थाध्यक्ष आर. वाय. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. पाटील म्हणाले, आजच्या धावपळीच्या आणि ग्लोबल वार्मिंगच्या काळात योग मानवाला अत्यंत उपयुक्त असून योग साधनेला प्रोत्साहन देणारी स्पर्धा आयोजित करून विद्यापीठाने विद्यार्थ्यांचे हित साधले आहे. कार्यक्रमास प्राचार्य डॉ. पी. जी. चौगले, डॉ. सुशांत मगदूम, निवड समितीचे प्रा. संजय धुरे, प्रा. सुनिल खराडे उपस्थित होते. स्पर्धेतून विजयी होणारे सहा खेळाडू मुले व मुली यांची मद्रास येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी निवड होणार आहे.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठास मल्लखांब स्पर्धेत सुवर्णपदक

**सकाळ वृत्तसेवा**

कसबा बावडा ता. १५ : अखिल भारतीय आंतर विद्यापीठ मलक मल्लखांब स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या मुलांच्या संघाने सुवर्णपदक पटकाविले. तसेच वैयक्तिक गटात सुशांत पाटील याने रौप्यपदक पटकाविले. चंदीगड येथील परमिंदर सिंह आलो आलिया विद्यापीठात ही स्पर्धा सुरू आहे. कालपासून सुरू झालेल्या या स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचा पुरुष व महिला संघ सहभागी झाला आहे. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या पुरुष संघाने सुवर्णपदक मिळवून मल्लखांबमधील गौरवशाली परंपरा राखली आहे. संघातील खेळाडू असे : सुशांत पाटील, कुणाल दारवान, अभिषेक मोरे केतन चिंचणे, सुहास कुंडूरकर.

Kolhapur, Kolhapur-Today
16/11/2018 Page No. 8